# कौटिल्याचे अर्थशास्त्र

**डॉ. सचिन चव्हाण** राज्यशास्त्र विभाग नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स इचलकरंजी

Email. Sachinchavan3421@gmail.com

---

**प्रस्तावना:**

कौटील्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ प्राचीन राजनीतीचे समग्रपणे विवेचन करणारा ग्रंथ म्हणून ओळखला जातो. २३०० वर्षापूर्वी हा ग्रंथ लिहिला गेला. त्यानंतर अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आली. अनेक राजकीय ग्रंथ प्रकाशित झाले. तरीसुद्धा या ग्रंथाला महत्वपूर्ण मानले जाते. कारण प्रस्तुत ग्रंथ प्राचीन राजनीतीचे विवेचन करणारा ग्रंथ आहे. अनेक प्राचीन ग्रंथाचा आधार घेऊन कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथ लिहिला आहे. राज्यकारभाराचे सविस्तर विश्लेषण करणारा ग्रंथ म्हणून 'अर्थशास्त्र' या ग्रंथाकडे पहिले जाते.

'कौटिलीय अर्थशास्त्र'हा ग्रंथ भारतीय संस्कृतीतला आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. यामध्ये १५ (विभाग) प्रकरण असून ६००० श्लोक असून१५० अध्यायांमध्ये हा ग्रंथ विभागला आहे. कौटिल्याने ग्रंथाच्या सुरवातीला असे स्पष्ट केले आहे कि, 'पृथ्वीची प्राप्ती आणि प्राप्त झालेल्या पृथ्वीचे (प्रदेशांचे) रक्षण कसे करावे याविषयी पूर्वीच्या आचार्यांनी अर्थशास्त्रावर जितके ग्रंथ लिहिले आहेत त्यातील बहुतेक ग्रंथाचा उपयोग करून मी हा ग्रंथ लिहित आहे.' हा ग्रंथ अर्थशास्त्र आणि राजनीती यांच्यावर लिहिलेला मानवी इतिहासातला पहिला ग्रंथ म्हणून ओळखला जातो. सदरचाग्रंथ आर्यकौटिल्य यांनी लिहिला असून विष्णुगुप्त, आर्य चाणक्य अशा नावांनीसुद्धा ते ओळखले जातात. तक्षशिला विद्यापीठात राज्यशास्त्र विषयाचा गाढा अभ्यासक आणि अध्यापक असलेला कौटिल्य हा एक उत्तम निरीक्षक होता त्याचे नैतिक अर्थशास्त्रावरचे विचार आजही ग्राह्य मानले जातात आणि आजही जगातील कांही विद्यापीठात कौटिल्याची तथ्य व्यवस्थापनाच्या अभ्यासक्रमात शिकवली जातात.

- **कौटिल्याचे अर्थशास्त्र:** आर्य चाणक्यांनी तीन महत्वाचे ग्रंथ लिहून अर्थशास्त्र, नीतिशास्त्र आणि चाणक्य नीति या ग्रंथांचा जगभरातल्या विद्वानांनी अभ्यास केला आहे. अर्थशास्त्रातला 'अर्थ' हा शब्द लोकांचे कल्याण करणे या अर्थाने वापराला आहे. राजाने राज्य कसे करावे याबाबत या ग्रंथात लिखान केले आहे. चाणक्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात एकूण १५ प्रकरणे असून पहिल्या ५ प्रकरणांमध्ये राजा, मंत्री आणि वेगवेगळे अधिकारी यांना प्रशिक्षित करण्याविषयी लिखाण केले आहे. कायदा आणि शासन, राज्याचं व्यवस्थापन याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. तसेच अधिकाऱ्यांची शिस्त, कर्तव्ये, कायदे आणि अर्थशास्त्राबद्दलची सखोल चर्चा या ग्रंथात केली आहे. राष्ट्राची आचारसंहिता काय असावी याबद्दल चाणक्यांनी आपली मते मांडली आहेत. सहाच्या प्रकारणात आदर्श राजा कसा असावा आणि त्याच्यातले ७ गुण कसे असावेत याबद्दल वर्णन केले असून सातव्या प्रकरणामध्ये राज्याच परराष्ट्र धोरण काय असलं पाहिजे याविषयी सखोल विवेचन केले आहे. आठव्या प्रकरणामध्ये वेगवेगळी व्यसने आणि प्रकृतीमध्ये कोणत्या ७ गोष्टींनी अपाय होऊ शकतो याची कारणे त्यांनी सांगितली आहेत.नवव्या प्रकरणामध्ये युद्धाची तयारी कशी करावी,सैन्य दल कसे असावे याविषयी, तर दहाव्या प्रकरणात प्रत्यक्ष युद्धभूमीवर काय घडू शकतं याविषयी चाणक्यांनी लिखाण केले आहे. अकराव्या प्रकरणात राज्याच संघटन आणि सर्व प्रकारच्या लोकांवर आपला अंकूश कसा ठेवला पाहिजे, राज्यातले उद्योग कसे असले पाहिजेत याबद्दल लिखाण केले असून बाराव्या प्रकरणामध्ये आपला शत्रू बलाढ्य असेल तर त्याला कस नामोहरम केलं पाहिजे याविषयी तर तेराव्या प्रकरणामध्ये शत्रूच राज्य कसं काबीज कराव याबद्दल अनेक बारकावे लिहिले आहेत. चौदाव्या प्रकरणामध्ये शत्रूला पराभूत करण्यासाठीचे उपाय सांगितले असून पंधराव्या प्रकरणामध्ये ३२ प्रकारची तंत्र वेगवेगळ्या लोकांशी वागताना कशी अंमलात आणायची त्याबद्दल सांगितले आहे.

अर्थशास्त्र या ग्रंथात चाणक्यांनी अर्थशास्त्राची नैतिकता मांडली आणि राजाची कर्तव्ये यावर भर दिला. राजाने नेहमी अर्थकारणाच्या व्यवस्थापनात सक्रिय असायला हवं असं चाणक्याचे मत होत. अर्थ (पैसा) याचं मूळ कृतीत आहे आणि या कृतीचा अभाव दारिद्रय आणतो, अर्थपूर्ण कृतीच्या अभावात वर्तमानातला आणि भविष्यातला विकास नष्ट होतो. अर्थकारणाला चालना मिळण्यासाठी विशिष्ट पोषक वातावरण आवश्यक असत. यासाठी योग्य असे कायदेकानून आणि त्यांची कर्तव्यदक्ष अंमलबजावणी गरजेची आहे तसेच ती अंमलबजावणी तत्परतेन नीट व्हावी अस चाणक्यानं लिहिले असून सदरची अंमलबजावणी न झाल्यास चाणक्यांनी त्यावर सूचनाही सुचविल्या आहेत. राज्यकारभाराची अचूक माहिती मिळवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या हेरांचा उल्लेख त्यांनी आपल्या अर्थशास्त्रात या ग्रंथात केला

आहे. चाणक्यांनी खाजगी व्यापारावद्दल अनुकूल मत माडली असलीतरी काही महत्वाचे उद्योग मात्र राजाच्या मालकीचे असले पाहिजेत आणि त्यावर राजाचेच नियंत्रण असले पाहिजे असे परखड लिखाणची केलेले दिसून येते.

- **व्यापार :**

राज्याच्या भरभराटीकरिता कौटिल्याने खासगी व्यापार्याला अनुकुलता दर्शवलेली आहे. व्यापाराच्या बाबतीत प्रोत्साहन देणाऱ्या अनेक गोष्टी चाणक्यानं सुचवल्या आहेत. विशिष्ट उद्योग हे राज्याच्या मालकीचे असावेत आणि त्यावर राजाचाच नियंत्रण असलं पाहिजे अस त्यांनी सांगितले. राजाचा खजिना हा नेहमी भरलेला असावा कि ज्यामधून आपल्या सैन्याचे पालनपोषण होईल. परदेशातून येणाऱ्या मालावर जकातमाफी असावी, सवलती असाव्यात म्हणजे आप-आपसातला व्यापार वाढू शकेल असे त्यांना वाटत असे. पण त्याचबरोबर आपला माल परदेशात पाठवताना मालाचे उत्पादन मूल्य, विक्री किंमत,मालावरील जकात, पहारेकरी यांचा पगार, विक्रीची किंमत, वाहनखर्च, मजुरी या सर्व गोष्टींचा विचार करून नफा किती होईल याचाही विचार त्यांनी केला होता. अचूक वजन,वजनाची नियमित तपासणी या गोष्टींनाही तितकंच महत्व त्यांनी दिलेले दिसून येते. व्यापार करताना भेसळ करणाऱ्यांसाठी त्यांनी खूप मोठा दंडही सुचविला आहे. धातूचे उत्पादनातील महत्त्व चाणक्यांनी जाणून घेतल होत त्यामुळे सोन्या-चांदीचे प्रकार, वजन करताना सोन मारण, कमी कसाचं सोनं मिसळणं या गोष्टींचेही आर्यचाणक्यांनी बारकाईन निरीक्षण केले होते.

माणूस हा जन्माने नाहीतर कर्माने श्रेष्ठ असतो असेसांगत असताना चाणक्यांनी शिक्षण हे माणवासाठी किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे.चाणक्यांनी लिहिलेल्या ग्रंथात शिस्त, अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कायदा, उद्योग,राष्ट्राची आचारसंहिता, कार्यालयीन हिशोब आणि कामकाम,व्यापार,जकात आणि उत्पादनशुल्क, मालमत्ता, ठेवी, कर्जवसुली, परराष्ट्रधोरण आणि अर्थशास्त्राविषयी चर्चा केली आहे. कामगारांचे हक्क, संरक्षण, मजुरी आणि कामाचेस्वरुप याविषयी त्यांनीविस्ताराने लिखाण केले असून संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणासाठी कठोर दंड केला जावा असंही सांगितले आहे. स्वदेशी मालावर ५% आणि परदेशी मालावर १०% नफा चाणक्यानी सुचविला असून शेतमालाचे उत्पादन आणि पैसे देण्याची क्षमता यावर किती प्राप्तीकर वसूल केला जावा याविषयी वर्णन त्यांनी आपल्या लिखाणात केले आहे. तसेच मानवाच्या दैनंदिन गरजांचा बारकाईनं अभ्यास करुन कांही सूचना सुचविल्या आहेत यामध्ये धान्य जमिनीलगत न ठेवता थोड उंचीवर ठेवावं किवा एका माणसाची आवश्यक गरज किती असते तर पावशेर तांदूळ, त्याच्या चौथा भाग डाळ, डाळीच्या सोळावा भाग मीठ आणि डाळीच्या चौथा भाग तेल किंवा तूप यासारख्या बाबींचा समावेश होतो. स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही आहाराचं प्रमाण किंवा वाटणी त्यांनीसारखीच मानून मुलांसाठी हा आहार १/३ असावा असे प्रकर्षाने सांगितले.सर्व अनाथ वृद्ध आणि निराधार व्यक्तींची जबाबदारी राजाने उचलली पाहिजे असे मत आर्य चाणक्यांच होतं.

- **अर्थ** –

'अर्थशास्त्र' या ग्रंथात कौटिल्याने अर्थशास्त्राची नैतिकता आणि राजाची कर्तव्य यावर भर दिला आहे. राजाला नेहमी अर्थकारणाचे व्यवस्थापण जमल पाहिजे. 'पैसा' हा राज्याच्या मध्यभागी असला पाहिजे पैशाअभावी राज्य दारिद्र्यात लोटत याकरिता योग्य ते कायदेकानून आणि त्याची कर्तव्य दक्ष अंमलबजावणी गरजेची आहे. अंमलबजावणी व्यवस्थित न झाल्यास त्यावर शिक्षेची तरतूद देखील कौटिल्याने केली आहे. राज्यकारभाराची अचूक माहिती मिळवण्यासाठी वेगवेगळया प्रकाराच्या हेरांचा उल्लेख 'अर्थशास्त्र' मध्ये येतो.

- **कररचना:**

कर रचनेबाबत आर्यचाणक्यांनी आपली भूमिका परखडपणे मांडली असूनसरकारला जमिनीवरचा कर,दंड या गोष्टी ६० प्रकारामधून मिळत असल्याचे नमूद केले आहे. तसेचवेळेवर हिशोब आले नाहीत तर रकमेच्या १० पट दंड,वेतन घेऊन काम केल नाही तर वेतनाच्या ५ पट दंड आणि एकच गुन्हा परत केला तर शिक्षा दुप्पट किंवा तिप्पट अशा प्रकारच्या शिक्षाही चाणक्यानं सुचविल्या आहेत. पूर, युद्ध, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीसाठी सरकारने सुरवातीस अन्नधान्य साठवून ठेवले तर आपत्तीशी सामना करता येतो असंही त्यांनीसांगितले आहे. कर कसे आकारावे आणि कसेगोळा करावेत,कर्जाच्या विविध योजना, यायोजना कशा राबविल्या पाहिजेत, कर्ज केव्हा, कसं आणि किती दिलं जाव, यावर व्याजाची आकारणी किती करावी याबाबतीत त्यांनीसविस्तर लिखाणकेले आहे.व्याजाचे सहा प्रकार सांगूनव्याज वर्षाच्या अखेरीस द्यावेआणि ते दामदुपटीहून अधिकअसता कामा नसे, मुदतीच्या अगोदर किंवा चक्रवाढ दराने जर व्याज आकारले तर मागणीच्या चौपट दंड आकारावा, तसेच आजारी किंवा अज्ञानी मनुष्यावर कर्जाचा भार

पडता कामा नये अशाही कांही समाजोपयोगी बाबी अर्थशास्त्र या ग्रंथात लिहून ठेवल्या आहेत.ठेवी ठेवताना व्याजदराचे जे नियम होते तेच नियम त्यांनी लागू केले आणि जर सावकारानं एखादी ठेवपरस्पर विकली तर ठेवीच्या किंमतीच्या चौपट रक्कम ठेवीदाराला दिली पाहिजे. मात्र याचा २०% भाग हा कर म्हणून आकारला जावा असे आर्य चाणक्यांचे मत होते आणि त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरु होत्ते.

कर गोळा करताना सरकारची भूमिका ही मध प्राशन करणाऱ्या मधमाशीसारखी असावी मधमाशी फुलातला आवश्यक तेवढाच मध घेते की ज्यामुळे मधमाशी आणि फूल दोघंही आनंदाने तर राहातातच पण त्यांच्या अस्तित्वाला बाधा येत नाही. अर्थव्यवस्थेत किती माणसं काम करतात,जो जास्त काम करेल त्याला जास्त पैसे मिळाले पाहिजेत,तसेचअनेकांनी एखादं काम एकत्र मिळून केल तर त्याच्यांतपैशाची वाटणी कशा प्रकारे झाली पाहिजे या सर्व गोष्टींचे विवेचन अर्थशास्त्र या ग्रंथात आहे.

**मंडल सिद्धांत** – कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात परराष्ट्र सबंध धोरणाची चर्चा केली आहे. प्रदेश व्याप्ती, साम्राज्य विस्तार राज्याचे रक्षण या दृष्टीने परराष्ट्र धोरणविषयक महत्व दिले आहे . कौटिल्याने जो मंडल सिद्धांत मांडला आहे त्यामध्ये आपल्या शेजारच्या सीमेलगत राष्ट्र हे आपले शत्रू मानावे. शत्रूचा शत्रू आपला मित्र या नात्याने शत्रूराष्ट्राच्या शत्रूशी मैत्री करावी. जे मित्र राष्ट्र आहेत त्यामध्ये व्यापाराला प्रोत्साहन द्यावे .

**कौटिल्याचे नितीशास्त्र:** कौटिल्याच्या नितीशास्त्रास‘ कौटिल्याचे अर्थशास्त्र’ या नावानेही ओळखले जाते.‘कौटिल्याचे अर्थशास्त्र’ हा प्राचीन भारतातील एक अत्यंत प्रभावी राजकीय आणि आर्थिक ग्रंथ असून यामध्ये चाणक्य (कौटिल्य) यांनी शासनाच्या विविध अंगांवर विचार मांडला आहे ज्यामध्ये राजकीय नीती, कूटनीती, आर्थिक धोरणे,सामाजिक व्यवस्थापन आणि युद्धनीती यांचा समावेश आहे. या ग्रंथामध्ये कौटिल्याने राज्याचे प्रमुख उद्दिष्ट लोकांच्या कल्याणाची साधना करणे, सुरक्षा सुनिश्चित करणे आणि सामाजिक न्याय राखणे असे असावे हे स्पष्ट केले आहे. शासकाने बुद्धिमत्तेने निर्णय घेणे, नैतिकतेची पाळणी करणेआणि प्रजेसमोर उदाहरण ठेवणे आवश्यक आहे. योग्य मंत्र्यांची निवड आणि त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करणे महत्त्वाचे असूनकार्यक्षम कर संकलनाची आवश्यकता जाणून घेऊन करांची योग्य पद्धत आणि त्यांचे प्रभावी संकलन यावर भर दिला आहे.आर्थिक विकासासाठी व्यापाराचे महत्त्व ओळखूनउद्योग आणि व्यापारास प्रोत्साहन देण्याबाबत उपाययोजना सुचविल्या आहेत. मित्र आणि शत्रू यांमध्ये योग्य निर्णय घेण्यासाठी विचारशीलतेवर जोर दिला असून प्रभावी संवाद साधण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. युद्धाची तयारी, संसाधनांचे व्यवस्थापन आणि रणनीतीची आखणी याबाबत कौटिल्याने अनेक तत्त्वे दिली आपल्या लिखाणात सांगितल्याआहेत. युद्धाच्या परिस्थितीत शांतता राखण्याचे महत्त्व आणि उपाययोजना स्पष्ट करून समाजातील विविध वर्गांचे प्रतिनिधित्व आणि त्यांच्या आवश्यकतांचे ध्यान ठेवणे तसेचशिक्षणाचे महत्त्व आणि सांस्कृतिक संवर्धनाची आवश्यकता विचारातघेऊनशासकांनी नैतिक मूल्ये जपून निर्णय घेतले पाहिजेत वसमता आणि न्याय सुनिश्चित केला पाहिजे अशा प्रकारचे प्रभावी लिखाण कौटिल्याने केले आहे.

**समारोप:** कौटिल्याचे नितीशास्त्र / अर्थशास्त्र आधुनिक काळातील राजकारण,अर्थशास्त्र आणि व्यवस्थापनासाठी एक अद्वितीय मार्गदर्शक ठरतो. प्राचीन राजकीय नीतीचे यथार्थ दर्शन घडवणार्या अर्थशास्त्र या ग्रंथाकडे ऐतिहासिक साधन म्हणून पहिले जाते. या ग्रंथात दिलेल्या तत्त्वांचा अभ्यास करून राजकीय नेता, शासक आणि व्यवस्थापक अधिक कार्यक्षमतेने व नैतिकतेने कार्य करू शकतात. कौटिल्याचे विचार आजही समकालीन समस्यांवर उपाय शोधण्यास मदत करतात. कौटिल्याने भारतीय राज्यसंस्थेबाबत जे विचार मांडले आहेत ते आधुनिक भारतीय विचारवंताना प्रेरणा देणारे आहेत. प्राचीन राजकीय व्यवस्थेचे व्यावहारीकदृष्ट्या केलेले विवेचन हे भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

1. समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत – डॉ. अरविंद शृंगारपुरे, विद्या प्रकाशन नागपूर.
2. भारतीय राजकीय विचार – प्रा. सुहास. गो. न्हीव्हेकर, विद्या सुरभी प्रकाशन, कोल्हापूर.
3. कौटिलीय अर्थशास्त्र – भावे . ह. अ
4. कौटिलीय अर्थशास्त्र – टिपणीस गोविंद गोपाल